05 FEB 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महापूर नियंत्रण समितीची माहिती सादर

## कारणे व उपाययोजना; शिवाजी विद्यापीठातील हवामान विभाग करणार अभ्यास

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : सांगली येथील कृष्णा महापूर नियंत्रण समितीने शिवाजी विद्यापीठाला महापुराची कारणे आणि उपाययोजना याबाबत संकलित केलेली माहिती सादर केली. विद्यापीठातील हवामान बदल विभाग त्याचा अभ्यास करणार आहे. त्यानंतर समितीच्या शिष्टमंडळासमवेत चर्चा करून महापूर नियंत्रणाबाबतच्या सूचना एकत्रितपणे शासनाला सादर केल्या जातील.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. आर. के. कामत, हवामान बदल विभागाचे प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांच्या समवेत शिष्टमंडळाने चर्चा केली. समितीने कृष्णा नदीच्या महापुराबाबत काही माहिती संकलित केली आहे.



**कोल्हापूर : सांगली येथील कृष्णा महापूर नियंत्रण समितीच्या शिष्टमंडळासमवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. आर. के. कामत, डॉ. सचिन पन्हाळकर.**

त्याचा विद्यापीठाने अभ्यास करून शासनाला महापूर नियंत्रणाबाबत काही सूचना सादर करता येईल, या उद्देशाने समितीने कुलगुरू डॉ. शिर्के यांची भेट घेतल्याचे अधिसभा सदस्य संजय परमने यांनी स्पष्ट केले.

चर्चेत हवामान बदल विभाग १५ मार्चपर्यंत समितीच्या माहितीवर अभ्यास करणार आहे. त्यानंतर १५ एप्रिलला पुन्हा बैठक घेऊन चर्चा करून महापूर नियंत्रणाबाबत मेच्या पहिल्या आठवड्यात शासनाला सूचना सादर करण्याचा निर्णय झाला.

यावेळी समितीतील हणमंत पवार, विजयकुमार दिवाण, प्रभाकर केंगार, प्रदीप वायचळ, शैलेश पवार, नीलेश पवार, संजय कोरे उपस्थित होते.

### समितीने सूचविलेले उपाय

कृष्णा नदीवरील बांधकामे, केंद्रीय जलआयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार धरणात पाणीसाठा न करणे, राजापूर बंधारा ते आलमट्टी धरणापर्यंत नदीचा नैसर्गिक उतार अत्यंत कमी असणे ही महापुराची कारणे समितीने विद्यापीठाला सादर केली आहेत. महाराष्ट्र, कर्नाटक राज्यात पूरनियंत्रणाबाबत सतत समन्वय असावा. पूरसंरक्षक समिती गठीत करावी, अशा विविध १९ सूचनांची माहिती दिली आहे.

सकाळ

# आविष्कार महोत्सवात नाव नोंदविण्याचे आवाहन

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठातर्फे 'आविष्कार संशोधन महोत्सव २०२१-२२' यंदा ऑनलाईन होत आहे. नावनोंदणीची अंतिम तारीख ९ फेब्रुवारीपर्यंत आहे. अशी माहिती समन्वयक डॉ. एस. बी. महाडिक यांनी दिली आहे. पदवी, पदव्युत्तर, एम.फिल./पीएच. डी.साठी प्रवेशित असणारे विद्यार्थी आणि एम. फिल, पीएच. डी. साठी प्रवेशित असणारे महाविद्यालयीन व विद्यापीठीय मान्यताप्राप्त शिक्षक अशा स्तरांवर महोत्सव होईल.

महोत्सवामध्ये सादर करण्यात येणाऱ्या संशोधन प्रकल्पांची विभागणी मानव्यविद्या, भाषा, ललितकला, वाणिज्य, व्यवस्थापन, कायदा, केवल विज्ञान, कृषी व पशुपालन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान आणि, वैद्यक व औषध निर्माण, शाखांत केली आहे. विद्यार्थी, शिक्षक यांची कोणतीही शाखा असली तरी ते अन्य शाखेअंतर्गतही संशोधन सादर करू शकतात.

कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांसाठी या फेरीचे आयोजन अनुक्रमे दि न्यू कॉलेज (कोल्हापूर), विलिंग्डन कॉलेज (सांगली) व दहिवडी कॉलेज (दहिवडी) या यजमान महाविद्यालयांतर्फे होईल. प्रथम फेरीतून निवडलेल्या पदवी स्तरातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ स्तरीय फेरीचे आयोजन विद्यापीठाच्या संगणकशास्त्र अधिविभागातर्फे केले आहे. इतर तीन स्तरांसाठी महोत्सव थेट विद्यापीठ स्तरावरच संगणकशास्त्र अधिविभागातर्फे होईल. नोंदणीसाठीची लिंक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येणार आहे.

लोकसत्ता

# संशोधन महोत्सव यंदा आभासी पद्धतीने

**कोल्हापूर :** करोना साथीच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाचा आविष्कार संशोधन महोत्सव यंदा आभासी माध्यमातून घेण्यात येणार आहे. नोंदणी करण्याची अंतिम तारीख ९ फेब्रुवारी आहे, अशी माहिती समन्वयक डॉ. एस. बी. महाडिक यांनी गुरुवारी दिली. पदवी, पदव्युत्तर, एम.फिल., पीएच.डी. साठी प्रवेशित आणि एम.फिल., पीएच. डी. साठी प्रवेशित मान्यताप्राप्त शिक्षक असे सहभागाचे चार स्तर आहेत. त्याची मानव्यविद्या, भाषा, ललितकला, वाणिज्य, व्यवस्थापन, कायदा, केवल विज्ञान, कृषी व पशुपालन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान आणि वैद्यक व औषध निर्माण अशी प्रकल्पांची सहा शाखांमध्ये विभागणी करण्यात येणार आहे.

पुढारी

# विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा १४ फेब्रुवारीपासून ऑनलाईन

## ७, ८ फेब्रुवारीला मॉक टेस्टचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर (हिवाळी सत्राच्या) परीक्षा १४ फेब्रुवारीला सुरू होणार आहेत. ऑनलाईन परीक्षेपूर्वी ७ व ८ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.३० ते २.३० या कालावधीत मॉक टेस्टचे आयोजन करण्यात आले आहे. यूजर आयडी व पासवर्ड विद्यार्थ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर एसएमएस द्वारे पाठविण्यात आला आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर.पळसे यांनी पत्रकाद्वारे दिली.

विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षांना १४ फेब्रुवारीपासून प्रारंभ होणार आहे. याबाबतचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांसाठी सूचना व ऑनलाईन संगणक प्रणालीचा डेमो व्हिडीओ ठेवण्यात आला आहे. परीक्षेपूर्वी मॉक टेस्ट घेतली जाणार आहे.



शिवाजी विद्यापीठातून

ज्या विद्यार्थ्यांना यूजर आयडी व पासवर्ड प्राप्त झालेला नाही, अशा विद्यार्थ्यांनी सदर लिंकवर जाऊन 'Get Your Password' हा पर्याय निवडून नोंदणीकृत ई-मेल आयडीवर पासवर्ड मिळवावा. तांत्रिक अडचणीसाठी विद्यापीठाच्या कॉल सेंटर, हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा. मुख्य परीक्षेमध्ये तांत्रिक अडचण होऊ नये, यासाठी विद्यार्थ्यांनी मॉक टेस्ट देणे बंधनकारक आहे. परीक्षेचे वेळापत्रक व अन्य माहितीसाठी विद्यापीठ संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन परीक्षा विभागातर्फे करण्यात आले आहे.

तरुण भारत

# विद्यापीठाच्या हिवाळी सत्राच्या परीक्षा १४ पासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्राच्या परीक्षा सोमवार (१४) फेब्रुवारीपासून सुरु होत आहेत. सर्व परीक्षा या ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत. या अनुषंगाने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांसाठी सूचना व ऑनलाईन संगणकप्रणालीचा डेमो व्हिडीओ ठेवण्यात आला आहे.

- **७, ८ फेब्रुवारी रोजी मॉकटेस्टचे आयोजन**

विद्यार्थ्यांनी तो पहावा. ऑनलाईन परीक्षेपूर्वी दि. ७ व ८ फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारी ९.३० ते २.३० या कालावधीत मॉक टेस्टचे आयोजन करण्यात आले असून यासाठीचा युजर आयडी व पासवर्ड विद्यार्थ्यांना त्यांच्या नोंदणी मोबाईलवर एसएमएस द्वारे पाठविण्यात आला आहे. मुख्य परीक्षेमध्ये कोणतीही तांत्रिक अडचण होवू नये. यासाठी विद्यापीठाकडील परीक्षेच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी सदरची मॉकटेस्ट देणे बंधनकारक आहे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
0 5 FEB 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात ७ पासून मॉक टेस्ट

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२१ (हिवाळी सत्राच्या) परीक्षा १४ फेब्रुवारीपासून सुरू होत आहेत. ऑनलाईन परीक्षेपूर्वी ७ व ८ फेब्रुवारीला दुपारी साडेबारा ते अडीच या कालावधीत मॉक टेस्टचे आयोजन केले आहे. त्यासाठी युजर आयडी व पासवर्ड विद्यार्थ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर एसएमएसद्वारे पाठविला आहे. त्याचे वेळापत्रक संकेतस्थळावर उपलब्ध आहे. हिवाळी सत्रातील परीक्षा ऑनलाईन होणार आहेत. या अनुषंगाने संकेतस्थळावर विद्यार्थ्यांसाठी सूचना व ऑनलाईन संगणक प्रणालीचा डेमो व्हिडिओ ठेवला आहे.

05 FEB 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शोषणमुक्त समाजासाठी ग्राहक जागृतीची गरज

## प्रा. विजयकुमार घुगरे; शिवाजी विद्यापीठ, झेप ॲकॅडमीतर्फे वेबिनार

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

ग्राहक हाच बाजारपेठेचा राजा आहे. तोच सर्व उद्योग-व्यवसायाचा भांडवल रूप आहे. तीच लोकशक्तीची प्राणशक्ती आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेवरील सामाजिक नियंत्रणासाठी आणि शोषणमुक्त समाजासाठी प्रबोधनाच्या माध्यमातून ग्राहक चळवळ अधिकाधिक मजबूत करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन डॉ. घाळी कॉलेजचे माजी प्र. प्राचार्य विजयकुमार घुगरे यांनी केले.



गडहिंग्लज : झेप ॲकॅडमीमार्फत आयोजित वेबिनारमध्ये मार्गदर्शन करताना प्रा. विजयकुमार घुगरे. सोबत मीना रिंगणे, गौरी बेळगुद्री.

शिवाजी विद्यापीठ आणि ज्ञानदीप प्रबोधिनी संचलित झेप ॲकॅडमीमार्फत आयोजित सहकार, सेवा, ग्राहक आणि जाणीव व जागृती या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्या मीना रिंगणे होत्या. मीना रिंगणे यांनी मनोगत व्यक्त केले. या वेबिनारमध्ये शिक्षण व सहकार क्षेत्रातील विद्यार्थी व नागरिक सहभागी झाले होते. सुमन बुवा यांनी प्रास्ताविक केले. गौरी बेळगुद्री यांनी सूत्रसंचालन केले. यशोधन बोकील यांनी आभार मानले.

### सहकाराचे मूळ आदिम काळात

सहकाराचे मूळ हे आदिम काळात आणि कृषी संस्कृतीमध्येच आहे. एकमेकांना सहकार्य करून जगण्याच्या भावनेतूनच सहकाराचा उदय झाला; परंतु बदलत्या आणि स्पर्धेच्या काळातील नफेखोरीच्या मानवी स्वभावामुळेच ग्राहकांच्या संरक्षणासाठी कायदा करावा लागला असेही घुगरे यांनी नमूद केले.

जनसंपर्क कक्ष
0 5 FEB 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेत
# श्री व्यंकटेश महाविद्यालयाची हॅट्ट्रिक

**इचलकरंजी : प्रतिनिधी**

येथील श्री व्यंकटेश महाविद्यालय हे गुणवत्तेमध्ये अग्रेसर असून, शिवाजी विद्यापीठाकडून हे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याने एक प्रकारे त्यावर शिक्कामोर्तबच झाले आहे, असे मत गुणवत्ता शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास बोहरा यांनी व्यक्त केले.

श्री व्यंकटेश महाविद्यालयास सलग तिसऱ्या वर्षी शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेत वाणिज्य विज्ञान शाखेतून २०२०-२१ निमशहरी गटातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना केंद्र शासन, राज्य शासन तसेच विद्यापीठाकडून मिळणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी प्राधान्याने प्रयत्न केले जातात. शिष्यवृत्ती मिळवून देण्यासाठी महाविद्यालयातील मुख्य लिपिक अनोष गायकवाड, कनिष्ठ लिपिक महेश चौगुले तसेच सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोठे योगदान आहे. त्यामुळे त्यांचाही याप्रसंगी सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी, गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक येण्याची महाविद्यालयाने हॅट्ट्रिक केली असून, यापुढे असेच यश संपादन करू असे सांगितले. संस्थेचे विश्वस्त महेश भांडवलकर, क्रीडा शिक्षण संचालक अमीन बाणदार व विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयातील माजी विद्यार्थिनी मयूरी प्रकाश वरदाई हिची पोस्ट खात्यामध्ये ब्रँच पोस्टमास्तर म्हणून निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. गुणवत्ता शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सकाळ

# विद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धा सोमवारी

गडहिंग्लज : शिवाजी विद्यापीठाची आंतरविभागीय क्रॉसकंट्री स्पर्धा सोमवारी (ता. ७) होणार आहे. या स्पर्धेचे यजमानपद येथील ओंकार महाविद्यालयाकडे आहे.

सकाळ

# एम. जगदीशकुमार 'यूजीसी'चे अध्यक्ष



जगदीशकुमार

नवी दिल्ली, ता. ४ : दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे (जेएनयू) कुलगुरू एम. जगदीश कुमार यांची विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

'जेएनयू'चे कुलगुरू म्हणून त्यांची कारकीर्द वादाच्या भोवऱ्यात सापडली होती. जगदीशकुमार यांची नेमणूक पाच वर्षांसाठी असेल. प्रो. डी. पी. सिंग यांनी ७ डिसेंबर रोजी राजीनामा दिल्यानंतर हे पद रिकामे झाले होते.